**सं.फौ.के. नं. ८१/२०१९**

**निशाण ०७ लगत**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०५ यांचा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**माझे नाव –** सविता जानू झोरे,

**वय – ४० वर्षे, व्यवसाय –** दुग्ध व्यवसाय,

**राहणार –** पाचांबे, नेरदवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

**सध्या राहणार –** सानपाडा, मुंबई.

**<u>सरकारतर्फे सरतपास सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. आर. वनकर यांचेकडून –</u>**

०१. २०१८ साली मी पाचांबे, नेरदवाडी येथे राहत होते. आम्ही दररोज सकाळी पाचांबे गावातून नायरी येथे एस. टी. बसने दुधविक्रीकरिता जात होतो. दिनांक २८/१२/२०१८ रोजी सकाळी ०६.१५ वाजता नेरदवाडी येथून मी नेरदवाडी ते संगमेश्वर जाणाऱ्या बसमध्ये बसले. मला नायरी येथे जायचे होते. सकाळी ०६.४५ च्या सुमारास आमची गाडी वाघजाईचे मंदिर, कापाची वाडी येथे आली. गाडीत एकूण वीस ते बावीस लोक होते. त्याठिकाणी ती बस पलटी झाली. बसच्या तीन पलटी झाल्या. ती बस पलटी कशी व कशामुळे झाली हे मला माहित नाही. त्यामुळे माझा उजवा हात मोडला होता. डोक्याला व पायाला दुखापत झाली होती. इतरांपैकी कोणाचा हात मोडला, कोणाचा पाय मोडला किंवा कोणाला कोठे लागले. सुरेखा झोरे, वनिता झोरे, सुमन कोलापटे, साखरी कोलापटे, अनंत सावंत, विकास कोलापटे हे सर्व लोक व शाळेचे विद्यार्थी त्या बसमध्ये होते.

०२. आम्हाला दुखापत झाल्यावर रुग्णवाहिकेतून आम्हाला संगमेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेले. मला त्या एस. टी. चालकाचे व वाहकाचे नाव माहित नाही. मी त्या एस. टी. चालकाला पाहिले होते. त्याला मी ओळखते. हा व्यक्ती तोच आहे (सदर बाब साक्षीदाराने न्यायालयापुढील आरोपीकडे पाहून सांगितली आहे).

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. पी. मांगले यांचेकडून –</u>**

०३. मी दुधाचा धंदा तीन ते चार वर्षे केला. मी तीन ते चार वर्षे बसनेच येऊन जाऊन करत होते. हे म्हणणे खरे आहे की, तो रस्ता अरुंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे एका बाजूला डोंगर व एका बाजूला दरी आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे डोंगराचे बाजूला गुरे चरतात. हे म्हणणे आहे की, अपघात झाला तेथे चढाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, दरीच्या बाजूला रस्त्याच्या कडेने काही तटबंदी नाही. हे म्हणणे खरे आहे की, तेथील भाग भुसभुशीत झालेला आहे. मी बसमध्ये मधल्या बाजूला बसले होते.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

BALIRAM DATTATRAYA TARE

Digitally signed by BALIRAM DATTATRAYA TARE
Date: 2023.08.17 13:58:46 +0530

(ब. द. तारे)

दिनांक १७/०८/२०२३ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

Judgment/order/evidence S.C.C. No. 81/2019)

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. S. Thaware (Jr. Clerk) |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of evidence | :- | 17/08/2023 |
| evidence signed by PO. on | :- | 17/08/2023 |
| evidence uploaded on | :- | 17/08/2023 |